सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७५, ४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://dte.maharashtra.gov.in

क्रमांकः २/एनजीसी/कागदपत्रे व शुल्क माहिती/२०२६/६५० दिनांक : 13 AUG 2026

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान संस्थांनी आवश्यक कागदपत्रे व शुल्क जमा करण्याची माहिती विद्यार्थ्यांना संकेतस्थळ/सुचना फलकावर उपलब्ध करून देणेबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई (सीईटी सेल) यांच्यामार्फत राबविण्यात येत असून, या अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या (CAP) प्रवेश फेऱ्या सुरू आहे. सीईटी कक्षामार्फत प्रवेश फेरीव्दारे विद्यार्थ्यांना जागावाटप (Allotment) करण्यात आल्यानंतर, जे विद्यार्थी फ्रीज (Auto Freeze/Self Freeze) हा पर्याय निवडुन विहीत शुल्क जमा करून जागा स्विकृत (Seat Acceptance) करतात, अशा विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्याकरीता संबंधित संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रक्रिये दरम्यान असे निदर्शनास येत आहे की, कॅप फेरीव्दारे जागा वाटप व तद्नंतर जागा स्तीकृती केल्यानंतर, प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याने संबंधित संस्थेत कोणती आवश्यक कागदपत्रे सादर करावयाची आहेत, याबाबत पुरेशी माहिती नसते, त्यामुळे विद्यार्थी अपुर्ण कागदपत्रांसह संस्थेत उपस्थित राहतात. परिणामी, प्रवेश निश्चितीवेळी विद्यार्थ्यांना कागदपत्र सादर करण्यास विलंब व गैरसोय निर्माण होते.

करीता आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुखांना, खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना माहिती सहज उपलब्ध होईल, अशा पद्धतीने संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच संस्थेच्या दर्शनी भागात सुचना फलकावर प्रसिद्ध करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्यात-

१. प्रत्येक संस्थेने संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता प्रवर्गानिहाय विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची अद्ययावत यादी प्रसिद्ध करावी. सदर यादीमध्ये लागू असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी आवश्यक कागदपत्रे स्वतंत्रपणे नमूद करावीत. यामुळे विद्यार्थ्यांना जागा वाटप झाल्यानंतर संस्थेत येण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून उपस्थित राहता येईल. तसेच अपूर्ण कागदपत्रांमुळे प्रवेश प्रक्रियेत होणारा विलंब, विद्यार्थ्यांची व पालकांची अनावश्यक ये-जा आणि प्रवेश कार्यालयावरील अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होईल.

२. संस्थेने विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमनिहाय व प्रवर्गानिहाय लागू असलेल्या मंजुर शुल्काची सुस्पष्ट माहिती उपलब्ध करून द्यावी. संस्थेस शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी मंजुर केलेल्या शुल्काची माहिती, प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

३. शुल्क जमा करण्यासाठी बँकेचे नाव, खातेधारकाचे नाव, खाते क्रमांक, IFSC Code, इ. तसेच शुल्क जमा करण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध पद्धती, जसे की ऑनलाइन पेमेंट, NEFT/RTGS/धनाकर्ष/ इत्यादींबाबतची सविस्तर माहिती स्पष्टपणे नमूद करावी. त्यामुळे विद्यार्थ्यांना शुल्क किती व कोणत्या पद्धतीने भरावयाचे आहे, याबाबत स्पष्टता मिळेल.

उपरोक्तप्रमाणे आपल्या अधिनस्त संस्थांनी उपरोक्तनुसार आवश्यक कागदपत्रांची यादी, शुल्काचा तपशील व शुल्क जमा करण्याबाबत कार्यपद्धतीची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली आहे किंवा नाही, याची विभागीय कार्यालयाच्या स्तरावरून वेळोवेळी पडताळणी करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ.प्रमोद नाईक)
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत : १)मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर
२)मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई -१ यांना माहितीकरीता.